# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/६५/६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

जाहिरात क्र. १०/२०१८-१९

## जाहीर सूचना

**प्रारूप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा.लि. च्या खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा-पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत.**

मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा.लि. यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) अधिनियम, २००५ अंतर्गत खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा - पुणे येथील सर्व्हे क्र. ६५(१), ६५(२) आणि ६५(३) येथे स्थित असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राकरीता ''विकासक'' म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४(बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील उप-कलम (१) नुसार, मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेकट्स प्रा.लिमिटेड हे, भारत सरकारच्या एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्याकरीता, एक मानीव वीज वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०१८ च्या प्रकरण क्र. ७५ मध्ये दि. २५ जून, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा.लि. यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा.लि. च्या खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा-पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ चे प्रारूप तयार केले आहे. या प्रारूप विनियमांची प्रत आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे. उपरोक्त प्रारूपावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती (१+६ प्रतींमध्ये), **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४००००५** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स - ०२२-२२१६३९७६; ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा या पत्त्यावर **दि. १० सप्टेंबर, २०१८** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

**मुंबई** **सचिव,**
**दिनांक :- ०९ ऑगस्ट, २०१८** **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 17**